माहिती हवीय?

ज्ञानेश्वर महाडीक, महाड.

□ कै. सूर्यकांत यांनी कोणकोणत्या चित्रपटात शिवाजीची भूमिका केली?

– *बहिर्जी नाईक*, *जय भवानी*, *शिलंगणाचं सोनं*, *पावनखिंड* या चित्रपटात.

संदीप खोपडे, पुणे.

□ आचार्य अत्रेनी कोणकोणते चित्रपट निर्माण केले? या चित्रपटापैकी एखाद्या चित्रपटात त्यांनी भूमिका केली होती काय?

– *पायाची दासी*, *बाईलवेडा*, *वसंतसेना*, *मोरूची मावशी*, *ब्रह्मघोटाळा*, *ही माझी लक्ष्मी*, *श्यामची आई*, *महात्मा फुले* हे मराठी व *चरणों की दासी* (*पायाची दासी*ची हिंदी आवृत्ती), *राजारानी*, *वसंतसेना* (हा चित्रपट मराठी-हिंदीत होता) *तस्वीर*, *दिल की बात*, *तकरार*, *परिंदे*, *ब्राह्मणकन्या*, *दुल्हा*, *खानदानी* हे हिंदी चित्रपट आचार्य अत्रेनी निर्माण केले. *मोरूची मावशी*, *महात्मा फुले* या चित्रपटात आचार्य अत्रेनी भूमिका केली होती.

राम बी. निम्हण, पुणे.

□ लता मंगेशकर कोणत्या मराठी चित्रपटात सर्वात प्रथम गायल्या? हे गाणे कोणत्या अभिनेत्रीवर चित्रीत करण्यात आले होते?

– १९४२च्या *पहिली मंगळागौर* या चित्रपटातील 'नटली चैत्राची नवलाई' हे लताबाईंचे पहिले मराठी गाणे. या चित्रपटात त्या बालतारका होत्या आणि त्यांच्यावरच हे गाणे चित्रीत झाले होते.

विजेता प्रश्न

विनोद दशपुत्रे, नागपूर.

□ शशी कपूर कोणकोणत्या चित्रपटात बालकलाकार म्हणून चमकला?

– *आग*, *आवारा*, *संग्राम*, *अब दिल्ली दूर नहीं* या चित्रपटात.

नानासाहेब भाऊसाहेब बालझाडे, शिळसापूर.

□ भारतात तयार झालेला पहिला हिंदी व मराठी बोलपट कोणता?

– पहिला हिंदी बोलपट १९३१चा *आलमआरा*. पहिला मराठी बोलपट १९३२चा *अयोध्येचा राजा*.

योगिता पाटील, अलिबाग.

□ बलराज साहनींचा शेवटचा चित्रपट कोणता?

– *गर्म हवा*.

अनुश्री प्रभुलकर, मरीन लाईन्स.

□ प्राणला कोणकोणत्या चित्रपटासाठी फिल्मफेअर पारितोषिक मिळाले?

– *उपकार*, *बेईमान*.

सायली चव्हाण, मालवण.

□ राज कपूर, शम्मी कपूर व शशी कपूर एखाद्या चित्रपटात एकत्र चमकले आहेत का?

– नाही.

सौ. शोभा प्रविणसिंह परदेशी, सोनई.

□ एखाद्या चित्रपट संस्थेच्या नावाने सलून, उपाहारगृह सुरू करण्याची प्रथा कोणत्या चित्रपट संस्थेच्या नावापासून सुरू झाली?

– प्रभात या चित्रपट संस्थेपासून, या चित्रपट संस्थेच्या लोकप्रियतेच्या काळात अनेक मातापित्यांनी आपल्या मुलाचे नामकरण देखील प्रभात असे केले. शांताराम बापूंनी देखील आपल्या मुलाचे नाव तेव्हा प्रभातकुमार असे केले होते.

दयाक्षी लोके, शिरगांव.

□ गिनिज बुकमध्ये कोणकोणत्या भारतीय कलावंतांच्या नावाची नोंद झाली आहे?

– मल्याळी चित्रपटातील अभिनेते स्वर्गीय प्रेम नजीर यांच्या नावाची.

संस्कृती सावंत, डांबरे, कणकवली.

□ लता मंगेशकर यांच्या आधी कोणकोणत्या पार्श्वगायिका होत्या?

– सुप्रवा सरकार, पारूल घोष, अमीरबाई कर्नाटकी, शमशाद बेगम, राजकुमारी, जोहराबाई अंबालावाली, ललिता देऊळकर (श्रीमती सुधीर फडके), कल्याणी, कौमुदी मुन्शी, सरस्वती राणे, हमिदा बानो, बेला मुखर्जी, झीनत बेगम, मालती पांडे, नसीम अख्तर, मुख्तरी बेगम, सितारा कानपूरी, उमरा जिया बेगम, रोशनआरा बेगम, अनिमा दासगुप्ता, रामदुलारी यापैकी अमीरबाई कर्नाटकी, शमशाद बेगम, राजकुमारी यांच्याबरोबर लताबाईंनी गाणी देखील गायली.

मदने राजेश गंगाधर, निंबळक.

□ माधुरी दीक्षित व मीनाक्षी शेषाद्री यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?



माधुरी दीक्षित व मीनाक्षी शेषाद्री स्वाती चित्रपटात

– १९८५चा *आवारा बाप*. त्यानंतर १९८६च्या *स्वाती*मध्ये ते एकत्र आले होते. मीनाक्षी तेव्हा नायिका होती व माधुरी तिच्यासमोर सहनायिका.

मीना मावळे, नारायणगाव.

□ राजेंद्रकुमारचा शेवटचा चित्रपट कोणता?

– *रिटर्न ऑफ ज्वेल थीफ*.

हेमंत कुलकर्णी, सोलापूर.

□ इसाक मुजावर यांची कोणकोणती पुस्तके आजवर प्रसिद्ध झाली आहेत?

– सिनेमा, दादासाहेब फाळके, राज कपूर, देव आनंद, मीनाकुमारी, फ्लॅश बॅक, गुरूदत्त-एक अशांत कलावंत, नूरजहाँ ते लता, अलबेला मा. भगवान, मुखवटा ही मराठी व महाराष्ट्र द वर्थ प्लेस ऑफ इंडियन फिल्म्स हे इंग्रजी अशी इसाक मुजावर यांची अकरा पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत. त्यांचे गुरूदत्त-एक अशांत कलावंत हे पुस्तक याच नावाने गुजरातीत निघाले आहे. तर मुखवटा हे पुस्तक गुजरातीत 'चेहरा मोहरा' या नावाने. एका सोंगाड्याची बतावणी व फिल्मी गोष्टी ही त्यांची दोन पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.